**नवी मुंबई महानगरपालिका**
**महापालिका सर्वसाधारण सभा**

महानगरपालिकेच्या शुक्रवार, दिनांक 19/05/2017 रोजी भरलेल्या माहे मे महिन्याच्या सर्वसाधारण सभेत मंजूर/नामंजूर इ. ठरावाची माहिती संक्षिप्त आणि मसुदा स्वरुपात खालीलप्रमाणे आहे. :-

| | |
|---|---|
| **विषय क्र. 03.**<br>**दिनांक 19 मे 2017** | **क्रिडा व सांस्कृतिक कार्यक्रम समितीचा, दिनांक 24 एप्रिल 2017 रोजीचा ठराव क्र. 6 :-**<br>मुख्य क्रिडा मार्गदर्शक, सहा. क्रिडा मार्गदर्शक व मदतनीस (मैदान सेवक) यांची नेमणूक करणेबाबतच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 15/03/2017. चे पत्र जा.क्र. नमुंमपा/क्रिडा व सांस्कृ/146/2016. |
| **ठराव क्र. 1663.**<br>**दिनांक 19 मे 2017** | "आयुक्तांच्या उपरोक्त पत्रामध्ये तपशीलवार दिल्याप्रमाणे, मुख्य क्रिडा मार्गदर्शक, सहा. क्रिडा मार्गदर्शक व मदतनीस (मैदान सेवक) यांची नेमणूक करणेबाबतच्या प्रस्तावात नमूद केल्यानुसार यापुढील काळात इतर खेळांचे प्रशिक्षण केंद्र सुरु करावयाचे झाल्यास यांच धर्तीवर मुख्य क्रिडा मार्गदर्शक, सहा.क्रिडा मार्गदर्शक व मदतनीस (मैदान सेवक) यांची आवश्यकतेनुसार वेळोवेळी नेमणूक करण्याचे अधिकार मा. आयुक्त यांना या ऐवजी, समितीने सुचविल्याप्रमाणे मा. क्रिडा समितीच्या व मा. महासभेच्या माध्यमातून रितसर प्रस्ताव सादर करणेस आणि सदर प्रस्तावातील मदतनीस (मैदान सेवक) यांची संख्या 06 वरुन 16 करण्यास, क्रिडा समितीच्या खर्चाचे अंदाजपत्रकास समितीमार्फत परवानगी देण्यास तसेच त्याची तपशिलवार माहिती समितीला सादर करण्यास, प्रस्तावात नमुद करण्यात आलेल्या बाबींसह सुचविल्याप्रमाणे, मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय -** | **मंजूर** |
| **विषय क्र. 04.**<br>**दिनांक 19 मे 2017** | **आरोग्य परिरक्षण व वैद्यकिय सहाय्य समितीचा, दिनांक 12 एप्रिल 2017 रोजीचा ठराव क्र. 2 व विधी समितीचा, दिनांक 25 एप्रिल 2017 रोजीचा ठराव क्र. 2 :-**<br>नमुंमपा कार्यक्षेत्रातील अनधिकृत तबेल्यांचे नियंत्रण व नियमन करण्याच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 23/12/2016 चे पत्र जा.क्र. नमुंमपा/आरोग्य/7872/2016. |
| **ठराव क्र. 1664.**<br>**दिनांक 19 मे 2017** | "नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातील अनधिकृत तबेल्यांचे नियत्रंण व नियमन करणेबाबतच्या प्रस्तावातील बाब क्र. 06 (3) मध्ये नमुद केल्यानुसार जनावरांच्या मलमुत्रावर प्रक्रिया करण्यासाठी गोबर गॅस प्लान्ट बसविणे बंधनकारक न करता त्यास शासनाकडून अनुदान प्राप्त झाल्यानंतर बसविण्यात यावेत, अशी दुरुस्ती करण्यास तसेच बाब क्र. 06 (8) वगळण्यास आणि तबेले किंवा गोठे यांच्या स्थाननिश्चयनाबाबत मार्गदर्शक तत्वे क्र. 01 ते 04 वगळण्यास प्रस्तावात नमुद करण्यात आलेल्या बाबींसह सुचविल्याप्रमाणे, मंजूरी देण्यात यावी." |
| **निर्णय -** | **स्थगित** |

| | |
|---|---|
| **विषय क्र. 05.**<br>**दिनांक 19 मे 2017** | परिवहन समितीचा, दिनांक **15** एप्रिल **2017** चा ठराव क्र. 03 **:-**<br><br>नवी मुंबई मानगरपालिका परिवहन उपक्रमाच्या सेवाभरती नियमांतील नियुक्तीच्या पध्दतीत तसेच पदसंख्येत बदल करणेच्या प्रस्तावाबाबत, परिवहन व्यवस्थापक यांचे दि.05/04/2017 चे पत्र जा. क्र. नमुंमपा/परि/प्रशा/318/2017. |
| **<u>ठराव क्र. 1665.</u>**<br>**दिनांक 19 मे 2017** | "नवी मुंबई महानगरपालिका परिवहन उपक्रमाचे स्वत:चे सेवा भरती नियम नसल्याने निर्माण होणाऱ्या अडचणी दूर करण्याच्या दृष्टीकोनातून परिवहन उपक्रमाच्या आस्थापनेकरिता नवी मुंबई महानगरपालिकेचे सेवाभरती नियम, इतर परिवहन उपक्रमाच्या तसेच महाराष्ट्र शासनाच्या सेवा भरती नियमांचा विचार करुन तयार करण्यात आले आहेत, मात्र, परिवहन उपक्रमाच्या 400 बसेसच्या आस्थापनेकरिता निर्माण केलेल्या पदांच्या सेवा भरती नियमांचा मा. परिवहन समितीने केलेल्या शिफारसींसह सुधारणा करण्यास, आणि प्रस्तावात नमुद करण्यात आलेल्या बाबींसह सुचविल्याप्रमाणे, मंजूरी देण्यात यावी." |
| **निर्णय -** | **<u>स्थगित</u>** |
| **विषय क्र. 07.**<br>**दिनांक 19 मे 2017** | नवी मुंबई महानगरपालिका प्रभाग क्र. 84 कुकशेत गाव येथे भूखंड क्र.पी-4 ठिकाणी उभारण्यात आलेली महिला/कम्युनिटी सेंटरची इमारत महिला मंडळाकडे भाडेकरार करून हस्तांतरीत करण्याच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 08/05/2017 चे पत्र क्र. नमुंमपा/मालमत्ता/779/2017. |
| **<u>ठराव क्र. 1666.</u>**<br>**दिनांक 19 मे 2017** | "नवी मुंबई महानगरपालिका प्रभाग क्र. 84 कुकशेत गाव येथे भूखंड क्र.पी-4 ठिकाणी उभारण्यात आलेली महिला/कम्युनिटी सेंटरची इमारत महिला मंडळाकडे भाडेकरार करून हस्तांतरीत करण्याच्या प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे प्रथमत: 5 वर्षासाठी, प्रत्येक वर्षी करारनामा नुतनीकरण करणेच्या अटीवर कुकशेत येथील भूखंड क्र. पी-4 या ठिकाणी उभारण्यात आलेली महिला / कम्युनिटी सेंटरची इमारत "लिव्ह अँण्ड लायसन्स" तत्वावर देणेकरिता महाराष्ट्र महापालिका अधिनियम कलम 79 (क) व (ड), मा.महापालिका सर्वसाधारण सभेच्या ठराव क्र. 1141, दि.15/02/2010 व दि.17/09/2012 च्या त्रिपक्षीय करारानुसार कुकशेत ग्रामस्थांकडून **<u>याऐवजी ग्रामस्थांकडून व ग्रामस्थांच्या संस्थेकडून</u>** अर्ज मागवून वाटप करणेची कार्यवाही करणेस, प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह, सुचविल्याप्रमाणे, मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय -** | **<u>उपसुचनासह मंजूर</u>** |

| | |
|---|---|
| **विषय क्र. 08.**<br>**दिनांक 19 मे 2017** | नवी मुंबई महानगरपालिकेच्या क्षेत्रातील मालमत्तांचे Light Detection and Ranging (LiDAR) Technology वापरुन सर्वेक्षण करण्याच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 12/07/2016 चे पत्र क्र. नमुंमपा/का.अ.वि/488/2016. |
| **<u>ठराव क्र. 1667.</u>**<br>**दिनांक 19 मे 2017** | "नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील मालमत्तांचे Light Detection and Ranging (LiDAR) Technology वापरुन सर्वेक्षण करणेकरीता प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह एकूण रक्कम रु. 20 कोटी मात्र इतक्या खर्चास, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 73(क) अन्वये, सुचविल्याप्रमाणे, प्रशासकीय मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय -** | **<u>मंजूर</u>** |
| **तांतडीचे विषय क्र. 15.**<br>**दिनांक 19 मे 2017** | कंत्राटी कामगारांना किमान वेतननुसार वेतन आदा करणेबाबतच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 12/05/2017 चे पत्र क्र. नमुंमपा /घकव्य /465 /2017. |
| **<u>ठराव क्र. 1668.</u>**<br>**दिनांक 19 मे 2017** | "कंत्राटी कामगारांना किमान वेतनानुसार वेतन अदा करणेबाबत प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाब क्र. 1 मध्ये नमुद करण्यात आल्यानुसार एका कंत्राटी सफाई कामगारास मासिक वेतनात सुधारणा रु. 8,021/- इतकी अतिरिक्त वाढ होणार असून, 2,646 कंत्राटी कामगारांचे अतिरिक्त वेतनापोटी वार्षिक रक्कम रु. 25 कोटी, 46 लक्ष, 82 हजार, 792 इतक्या अतिरिक्त खर्चास, तसेच बाब क्र. 2 व 3 मध्ये नमुद केल्यानुसार व बाब क्र. 4 मध्ये नमूद केल्याप्रमाणे घनकचरा व्यवस्थापन विभागामार्फत करण्यात येणा-या हाऊस किंपींग व दैनंदिन साफसफाई कामाकरीता आवश्यक असलेल्या एकूण 82 कंत्राटी कामगारांना किमान वेतन धोरणानुसार होणा-या मासिक वाढीव रक्कम रुपये 8,021/- नुसार अतिरिक्त वार्षिक रक्कम रु. 78 लक्ष, 92 हजार, 664 इतक्या खर्चास, तसेच महानगरपालिकेच्या विविध विभागांतर्गत म्हणजेच, 1) नवीन मुख्यालय साफसफाई-घनकचरा- कचरा वाहतूक विभाग, 2) उद्यान विभाग, 3) शिक्षण विभाग, 4) क्रिडा विभाग, 5) विष्णूदास भावे नाट्यगृह, 6) मालमत्ता विभाग, 7) आरोग्य विभाग अ) मलेरिया, ब) रुग्णालय, क) आरोग्य केंद्र साफसफाई ड) पशुवैद्यकीय विभाग, 8) कार्यकारी अभियंता (मोरबे), 9) कार्यकारी अभियंता- स्थापत्य/पाणी पुरवठा/ मलनि:स्सारण/विद्युत-परिमंडळ-1 व 2, 10) स्मशानभूमी (सर्व विभाग कार्यालय), नवी मुंबई महानगरपालिका वरील विभागातील कुशल/अर्धकुशल/अकुशल कर्मचारी असे सर्व कार्यालयात कार्यरत असलेल्या व वाढीव कंत्राटी कामगारांना अशाप्रकारे किमान वेतन धोरणानुसार वेतन अदा करणेस आणि यापोटी येणा-या संभाव्य अतिरिक्त खर्चास मान्यता देण्यास तसेच सदरची कार्यवाही मा. आयुक्त स्तरावर करणेबाबत अधिकार प्रदान करण्यास, सुचविल्याप्रमाणे मंजूरी देण्यात यावी." |
| **निर्णय -** | **<u>उपसुचनासह मंजूर</u>** |

**सही/-**
**(चित्रा बाविस्कर)**
**महानगरपालिका सचिव,**
**नवी मुंबई महानगरपालिका.**